**RAMNARAIN RUIA AUTONOMOUS COLLEGE, MUMBAI-19**
**Dept. of Marathi**
**Minutes of the meeting of the Board of Studies**

Date: **26 March 2025**
Time: **12 noon**
Venue: **Board Room**
Members Present: **05**

| Sr. No. | Name | Signature |
|---|---|---|
| **1.** | **Shilpa Neve** | **Attached** |
| **2.** | **Ashwini Badadare** | **Attached** |
| **3.** | **Abhijit Deshpande** | **Attached** |
| **4.** | **Rashmi Warang** | **Attached** |
| **5.** | **Anagha Pendse** | **Attached** |

**1. To revise and approve the syllabi for TYBA/BSc/BVoc/BACM for the academic year 2025-26 under NEP.**

उपस्थित अभ्यासमंडळ सदस्यांमध्ये NEP अंतर्गत तृतीय वर्ष मराठीच्या अभ्यासक्रमासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षणाच्या दृष्टीने पाया तयार व्हावा हा विचार केंद्रस्थानी ठेवून सैद्धांतिक विषय DSC अंतर्गत ठेवण्याचा निर्णय झाला. DSC अंतर्गत दोन्ही सत्रातील विषयपत्रिका पुढीलप्रमाणे -
DSC 1 - मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (सत्र ५ आणि ६)
DSC 2 - भारतीय आणि पाश्चात्य साहित्यशास्त्र (सत्र ५ आणि ६)
DSC 3 - भाषाविज्ञान आणि मराठी व्याकरण (सत्र ५ आणि ६)

Elective 1 (सत्र ५ आणि ६) - साहित्य आणि समाज ही अभ्यासपत्रिका घेण्याचे निश्चित करण्यात आले. साहित्य आणि समाजाचा सैद्धांतिक भाग, वाङ्मयप्रवाह आणि त्या वाङ्मयप्रवाहांतर्गत नेमता येऊ शकणाऱ्या ज्या साहित्यकृती विभागाच्या विचाराधीन आहेत त्यांची माहिती अभ्यासमंडळ सदस्यांना देण्यात आली. या अभ्यासक्रमाच्या दोन्ही सत्रातील विभागणी संदर्भात आणि नेमण्यात येणाऱ्या कलाकृतींच्या संदर्भात विभाग जो निर्णय घेईल त्याला अभ्यासमंडळाची मान्यता असेल असे ठरले.

Elective 2 (सत्र ५ आणि ६) - लेखकाभ्यास ही अभ्यासपत्रिका नेमण्याचे निश्चित करण्यात आले. या अभ्यासपत्रिकेत लेखकाभ्यासाची संकल्पना विद्यार्थ्यांना स्पष्ट करून नेमलेल्या लेखकाच्या ३ लेखनप्रकारातील साहित्यकृती विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी घ्याव्यात असे ठरले. लेखकाभ्यासासाठी विद्याधर पुंडलिक, रत्नाकर मतकरी, प्रज्ञा दया पवार या लेखकांच्या लेखनाची चर्चा झाली. यातील कोणताही लेखक लेखकाभ्यासासाठी नेमण्यास अभ्यासमंडळाने मान्यता दिली. लेखकाभ्यासासाठी रत्नाकर मतकरींच्या लेखनाचा अधिक विचार व्हावा, अशी सूचना प्रा. अभिजित देशपांडे यांनी केली. सैद्धांतिक भाग आणि नेमलेल्या लेखकाच्या कलाकृती यांची दोन्ही सत्रांमध्ये विभागणी कशी करायची हे विभागाने निश्चित करावे असे ठरले.

VSC (सत्र ५) - भाषांतर प्रक्रियेविषयी हा अभ्यासक्रम असावा असे सर्वानुमते निश्चित करण्यात आले. यात सैद्धांतिक भागावर भर कमी करून प्रत्यक्ष विविध स्वरुपाच्या भाषांतरांचा विद्यार्थ्यांना सराव व्हावा अशी अभ्यासक्रमाची रचना असावी अशी सूचना अभ्यासमंडळातर्फे करण्यात आली. प्रत्यक्ष भाषांतर करण्याच्या प्रक्रियेतच आवश्यक तेथे सैद्धांतिक बाबी विद्यार्थ्यांना सांगण्यात याव्यात. तांत्रिक स्वरुपाचे

भाषांतर, मुक्तानुवाद आणि अर्वाचिनीकरण यासंदर्भातील कौशल्ये विद्यार्थ्यांना शिकवण्यावर भर असावा असे निश्चित झाले.

Minor (सत्र ५ आणि ६) - यासाठी नव्वोदोत्तर मराठी साहित्यातील ४ कलाकृती घ्याव्यात आणि प्रत्येकी २ कलाकृती प्रत्येक सत्रात शिकवाव्या असा विभागाचा विचार असल्याचे प्रा. शिल्पा नेवे यांनी सांगितले. केवळ कलाकृतींचा अभ्यास करण्यापेक्षा मायनरचे विद्यार्थीही पदव्युत्तर शिक्षणासाठी मराठी साहित्याचा विचार करण्याची शक्यता गृहीत धरून मायनरच्या अभ्यासक्रमातही काही सैद्धांतिक भाग असावा अशी सूचना प्रा. अभिजित देशपांडे यांनी केली. त्यांनी मध्ययुगीन मराठी गद्य, कविता यांचा स्थूलपरिचय देणारा अभ्यासक्रम मायनर अंतर्गत नेमता येईल अशी सूचना केली. यासूचनेनुसार मायनर मराठीच्या अभ्यासक्रमाचा पुनर्विचार करून, नियोजित अभ्यासक्रम ठरवून मेलद्वारे आपणांस कळवू असे मराठी विभागातर्फे सांगण्यात आले. त्याला अभ्यासमंडळ सदस्यांनी मान्यता दिली.

Field Project and OJT (सत्र ५ आणि ६) - या संदर्भातील व्यावहारिक अडचणी आणि विद्यार्थ्यांची एकूण आकलनक्षमता, कार्यक्षमता यांनुसार महाविद्यालय जे धोरण ठरवेल आणि त्यानुसार मराठी विभाग जो निर्णय घेईल त्याला अभ्यासमंडळाची पूर्ण अनुमती असेल.

आपल्या माजी विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमाविषयीचा प्रतिसाद, अभ्यासक्रम शिकवण्यातील व्यावहारिक अडचणी, आपल्यापुढील विद्यार्थी यांचा विचार करून मराठी विभागाने अभ्यासक्रमाविषयी निर्णय घ्यावेत. अभ्यासमंडळ सदस्यांना ते मेलद्वारे कळवावेत आणि या सर्व निर्णयांना, तसेच आखलेल्या अभ्यासक्रमाला अभ्यासमंडळाची पूर्ण सहमती असेल असे सर्वच सदस्यांनी नमूद केले.

**2. To decide on the changes in the modalities of assessment, is any, which includes the question paper pattern, for internal and external examination for FY/SY/PG Part I & II.**
अभ्यासक्रमावरील प्रश्नपत्रिकांमध्ये करण्यात येणाऱ्या गुणविभागणी संदर्भात महाविद्यालयाचे जे एकूण धोरण असेल त्याला अभ्यासमंडळाची अनुमती असेल असे ठरले.

**3. To discuss our own Certificate Courses and approve 2-4 credit Certificate Courses offered by NPTEL Swayam /MOOC.**
प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि क्रेडिट सर्टिफिकेट कोर्सेस यासंदर्भात महाविद्यालयाच्या आणि त्यानुसार विभागाच्या निर्णयांना अभ्यासमंडळाची पूर्ण मान्यता असेल.

**4. To review the feedback of students on the Curricula.**
आशय वैविध्य असणाऱ्या कलाकृती आणि त्यांच्या सद्यः वास्तवाशी, जीवनाशी जोडू पाहणाऱ्या कलाकृती अभ्यासक्रमात असाव्यात अशा विद्यार्थ्यांच्या सूचना असल्याचे प्रा. अश्विनी बडदरे यांनी नमूद केले. याद्दष्टीने विषयपत्रिकांमध्ये नेमण्यात येणाऱ्या साहित्यकृतींच्या संदर्भात विभागाने स्वागतार्ह बदल करावेत आणि त्याला अभ्यासमंडळाची कोणतीही हरकत नसेल असे ठरले.

**5. To review Questions Papers of previous exams.**
निश्चित करण्यात आलेल्या नमुन्याप्रमाणेच प्रश्नपत्रिका असल्यामुळे त्यावर विशेष चर्चा झाली नाही.

**6. Any other matter with the permission of the Chair.**
N.A.

**Signature: Shilpa Neve**

**In-charge HOD, Marathi**

**Prof. Dr. Anushree Lokur**

**Principal**